नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०७/०९/२०२५ (रविवार)**

---

## नागपूर ग्रामीण जिल्हयात दिनांक ०६/०९/२०२५ रोजी गणेश विसर्जन शांततेत पार पडल्याबाबत...

दिनांक ०६/०९/२०२५ ते ०८/०९/२०२५ या कालावधीत सार्वजनिक आणि घरगुती गणपतीचे विर्सजन होणार असुन विसर्जना दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही यासाठी नागपुर ग्रामीण पोलीसांचा कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला आहे.

काल दिनांक ०६/०९/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील प्रमुख विसर्जन स्थळे कन्हान येथील कालीघाट तसेच मौदा येथील माथनी घाट येथे विसर्जन स्थळावर मोठया प्रमाणात नागपुर शहर आणि ग्रामीण भागातील सार्वजनिक तसेच घरगुती गणपतींचे विसर्जन होत असल्याने नमुद घाटांवर तसेच सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत विर्सजन स्थळावर आणि विसर्जन मिरवणूक मार्गांवर योग्य बंदोबस्त तैनात करण्यात आले आहे. नागपुर ग्रामीण पोलीसांच्या सतर्क बंदोबस्तामुळे योग्य वाहतुक नियोजनामुळे तसेच जनसामान्यांच्या सहकार्यामुळे दिनांक ०६/०९/२०२५ रोजी एकुण २५४ सार्वजनिक गणपती तसेच ८५९९ घरगुती गणपतींचे विर्सजन सुरळीत आणि शांततेत पार पडले.

## पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत कोहळी शिवारातील जाकीर पटेल फार्म हाउस येथे अवैधरित्या हुक्का उपलब्ध करून देणाऱ्या आरोपीतांवर गुन्हा नोंद स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :—** दिनांक ०७/०९/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील कोहळी शिवारातील जाकीर पटेल फार्म हाउस येथे विना परवाना हुक्का व तंबाकु जन्य पदार्थ लोकांना पिण्यासाठी उपलब्ध करून दिले जातात. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी जाकीर पटेल फार्म हाउस ,कोहळी येथे पंचासमक्ष छापा टाकला असता तिथे आरोपी क्रं १) महेश वसंतराव बडेकर, वय २५ वर्षे,रा. राजीव नगर हिंगणा नागपूर (हुक्का पुरवणारे ) हा मिळुन आला त्याला फार्म हाउस मालकाबाबत विचारणा केली असता त्याने आरोपी क्रं २) जाकीर हुसेन पटेल, रा. जाफर नगर, नागपूर, असे नाव सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळाची झडती घेतली असता तिथे एकुण ०३ हुक्का पॉट ,कोळसा , इलेक्ट्रिक लहान शेगडी आणि तंबाखुजन्य पदार्थ असा एकुण किंमती ४,९४० /— रूपयांचा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त केला.

वर नमुद आरोपीतांनी हुक्का व तंबाखु जन्य पदार्थ व साहित्य लोकांना उपलब्ध करून दिल्याने नमुद आरोपी यांचे विरूध्द पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम ४ (क), २१(क) सिगारेट आणि ईतर तंबाखू उत्पादने (जाहीरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन यांचे विनियमन) अधिनियम २००३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद खापा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन खापा** :— दिनांक ०६/०९/२०२५ रोजी खापा पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा बडेगाव येथे नाकाबंदी केली असता सिल्वर रंगाची जुपीटर मो.सा. क्र. एम.एच.४० डी.डी.७१३९ ही येताना दिसली. वाहन थांबवुन चालकास नाव पत्ता विचारले असता आरोपी नामे आकाश बल्लुजी चौधरी, वय २८ वर्ष रा.बडेगाव ता.सावनेर जि.

नागपुर अशी माहीती समजली.वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू मिळुन आली. पोलीसांनी पंचासमक्ष १) बांगरी संत्रा नं.०१ देशी दारू किंमती १२६० /— रूपये २) जुपीटर मो. सा.क्र.एम.एच.४० डी.डी.७१३९ आणि रोख रक्कम असा एकुण किंमती ६१,५९० /— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन खापा येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना मोहाफुल गावठी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद,सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर**:— दिनांक ०६/०९/२०२५ रोजी सावनेर पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारूची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा रिठि पारडी शिवार, पांढुर्णा रोड येथे नाकाबंदी केली असता टी व्ही एस जुपीटर १२५ मोपेड क्र एम एच ४० सी डब्लु ६२५५ येताना दिसली. वाहन थांबवुन चालकास नाव पत्ता विचारले असता चालक आरोपी नामे संदीप अनिल राजपुत, रा. वार्ड क्र ३ तिडंगी , सावनेर, अशी माहीती समजली.वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता मोहाफुल गावठी दारू मिळुन आली. पोलीसांनी पंचासमक्ष १) ३० लिटर मोहाफुल गावठी दारू आणि २) टी व्ही एस जुपीटर १२५ क्रमांक एम. एच. ४० सी.डब्लु. ६२५५ असा एकुण किंमती ५३,००० /— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीत अवैधरित्या विनापरवाना दारूची विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हे नोंद, स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक ०६/०९/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त बातमीदारांकडुन मिळालेल्या माहीतीन्वये कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीत अवैध दारू बाबत खालील प्रमाणे कारवाई केल्या.

**कारवाई क्रं १ :—** मोहपा आठवडी बाजार येथे आरोपी नामे ऋषिकांत योगेश्वर चर्जन,वय ३३ वर्ष रा. मसेपठार, मोहपा ता. कळमेश्वर जि. नागपूर हा मागणी प्रमाणे त्याचे ताब्यातील दुचाकीने जावुन अवैधरित्या दारू विक्री करतो अशी माहीती प्राप्त होताच घटनास्थळी जावुन नमुद आरोपी याचे ताब्यातुन १) विदेशी दारू ७१ नग १८० आणि ९० मिली. एकूण किंमत १०,४९० /— रूपये २) देशी भिंगरी दारू ७५ निपा प्रत्येकी ९० मिली. एकूण किंमत ३,०००/— रूपये ३) दारू विक्रीतून मिळालेली नगदी रक्कम २५,५६०/ रूपये ४) विवो कंपनीचा मोबाईल किंमत १०,०००/— रूपये ५) अॅक्टिवा मोटरसायकल किंमत ९०,०००/— रूपये एकूण किंमत १,३९,०५० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**कारवाई क्रं २ :—** अरमान धाबा, डोरली भिंगारे येथे आरोपी नामे धीरज मेश्राम, वय ३६ वर्ष रा. करणे लेआउट वार्ड, क्रमांक १५. कळमेश्वर, जि. नागपूर हा मौजा डोरली भिंगारे येथे त्याच्या मालकीच्या अरमान धाब्यावर अवैधरित्या देशी दारूची विक्री करतो अशी माहीती प्राप्त होताच. घटनास्थळी जावुन नमुद आरोपीच्या ताब्यातुन देशी भिंगरी दारू १९ निपा १८० मिलीच्या . एकूण किंमती १,५२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही कारवाई मध्ये एकुण १,४०,५७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

वर नमुद दोन्ही आरोपीतांवर पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हे नोंद करण्यात आला आहे.



# अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू बाळगणाऱ्या,व्रिकी, वाहतुक तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, २५ गुन्हे नोंद एकुण १,७८,९६५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक ०६/०९/२०२५** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी तसेच स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री, वाहतुक आणि सेवन करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू, विदेशी दारू आणि वाहन असा एकुण १,७८,९६५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन पारशिवणी** येथे आरोपी नामे सुनिल संपतराव बुटले, वय.५३ वर्ष , रा. दहेगाव जोशी. त. पारशिवनी याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे विकास सोमा उईके, वय ६६ वर्ष, रा. झिंझेरीसा ता. रामटेक, याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे संजय मोहन राठोड, वय ३६ वर्ष, रा

पुसागोंदि, यांचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) धनश्याम पुडलिकराव कामळे, रा. रेवतकर ले आउट काटोल जि नागपुर, २) रविद्र अशोकराव गजभिये, वय ४५ वर्ष रा.ढवळापुर , ३) निलेश गुलाबसिंग चौव्हाण, वय ३७ वर्ष रा. बस स्टॅन्ड समोर (सरस्वती नगर काटोल),याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे १) दिलीप रामभाउजी झाडे, वय ५५ वर्ष रा. हिरवा तलाव जवळ मंगळवारीपेट उमरेड, २) बबन यशवंत वाघमारे ,वय ५७ वर्ष रा. पारधी बेडा राजुरवा, ३) राहुल विजय पौनिकर, वय ३२ वर्ष रा राम मेडिकलजवळ पोगीठाणापेठ उमरेड, याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे १) निखिल ज्ञानेश्वर बोलाखे, वय ३२ वर्ष रा. ५१४, लभान तांडा, जुनी शुक्रवारी हनुमान नगर,नागपुर,यांचे वर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन भिवापुर** येथे आरोपी नामें १) राजेश यशंवत शहारे, वय ५३ वर्ष रा पवनी ता पवनी जि भंडारा,२) हरिचंद्र रामचंद्र महाल्ले, वय ५० वर्ष रा भागेबोरी ता भिवापुर जि नागपुर,याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे १) इस्माईल अकबर पठाण, वय ५३ वर्ष रा वार्ड क्र ०३ टाकळघाट ता हींगणा जि नागपुर, यांचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे १) इंद्रकुमार रेखाराज चंद्राकर, वय ३४ रा. सोनेगाव लोधी ता. जी. नागपूर, २) राकेश किशन चौधरी,वय ४२ वर्षे,रा हिवरा हिवरी ता उमरेड जि नागपुर,यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे १) रामचंद्र किस्तीया गड्डावार, वय ५५ वर्षे रा. वार्ड क्रं ६ बोरी, जि. नागपुर, २) अनुज यादव भोसले, वय ४४ वर्षे रा. गवळी टोला आसोला याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे १) मुरलिधर दुर्गाजी हटवार वय ५६ वर्ष रा अबिका हॉटेल चे मागे वाघमारे नगर ता सावनेर,२) संदीप अनिल राजपुत, रा वार्ड क्र ३ तिडंगी , सावनेर, आणि महीला आरोपी याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे १) रवी शंकर मडावी, वय २७ वर्ष छत्रापुर हमु. घाटोळे ले आउट प्लॉट न ५ सावनेर, याचेवर १ गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे १) प्रथमेश दिनेश सहारे, वय २३ वर्ष रा. नागलवाडी ता. सावनेर आाणी २) आकाश बल्लुजी चौधरी,वय २८ वर्ष, रा.बडेगाव ता. सावनेर जि.नागपुर याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी नामे अतुल रूपराव रामेकर वय ३६ वर्ष रा. वार्ड क्र. ०१, निमजी, ता.कळमेश्वर जि.नागपूर, याचेवर १ गुन्हा नोंद आहे अशा आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये २५ गुन्हे दाखल केले आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**